सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.co.in
e-mail : dydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

जा.क्र.शिउसं/पुवि/उमा-४०१/चौ./२०२३/5993 दि.०८/०६/२०२३

प्रति,

१) शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. पुणे

२) शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. अहमदनगर

३) शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. सोलापूर

**विषय:- इयत्ता ११ वी १२ वी च्या प्रवेश प्रक्रियेबाबत**

**संदर्भ:-** १) शासन पत्र क्र.DBT-२०१७/प्र.क्र.२२/एसडी-५, दि.३१/१०/२०१८

२) शुल्क विनियमन अधिनियम -२०१६

३)शालेय शिक्षण विभागाचे पत्र क्र.प्रवेश-२०१७/प्र.क्र.२५०/एस.डी.-२, दि.०९/०८/२०१८

४) शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.) यांचे पत्र क्र.उच्च माध्य.-२४१/११ प्रवेश/२०१८/७३६७, दि.१३/०८/२०१८

५) शालेय शिक्षण विभागाचे पत्र क्र.प्रवेश -२०१८/प्र.क्र.३३३(भाग-१)/एसडी-२, दि.११/०८/२०२०

६)प्रस्तुत कार्यालयाचे परिपत्रक क्र.शिउसं/पुणे/उमा-४०१/१२ वी प्रवेश/परिपत्रक/२०२२/७२६२, दि.०५/०७/२०२२

७) छात्र भारती संघटनेचे निवेदन दि.०८/०६/२०२३

उपरोक्त विषयांकित संदर्भीय पत्र क्र.३ अन्वयेछात्र भारती संघटनेने निवेदन दिलेले असून इयत्ता ११ वी १२ वी च्या प्रवेश प्रक्रियेच्या वेळी अवाजवी व बेकायदा शुल्क आकारून कनिष्ठ महाविद्यालयांकडून विद्यार्थी व पालकांची मोठ्या प्रमाणात लुट होत असल्याचे नमूद केलेले आहे. सदर निवेदनाची प्रत सोबत जोडलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करणे बाबत आपल्या जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून तात्काळ कार्यवाही करणेबाबत कळवावे.

१)ज्या कनिष्ठ महाविद्यालयांना अंशत: अनुदान प्राप्त झालेले आहे. त्यांनी त्या प्रमाणात शुल्क कमी करावे.

२)अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांनी संदर्भ क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शुल्क आकारावे.

३) विना अनुदानित व स्वयंअर्थसाहाय्यीत कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रत्येक वर्षाचे लेखापरीक्षण करून घेऊन देण्यात येणाऱ्या सोई सुविधा नुसार तसेच संदर्भ क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शुल्काबाबत कार्यवाही करावी.

४) इयत्ता ११ वी मध्ये प्रवेशाच्या वेळी विहित कार्य पद्धतीचा व विहित आरक्षण धोरणाचे कटाक्षाने पालन करावे.

५) इयत्ता ११ वी व १२ वी प्रवेशाच्या वेळी संदर्भ क्र.३ ते६ मध्ये दिलेल्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे.

उपरोक्त निर्देशांचे पालन होईल याकडे आपण वैयक्तिक लक्ष घालून कार्यवाही करावी. सदर बाबत तक्रारी प्राप्त झाल्यास आपल्या स्तरावरून नियमानुसार कठोर कारवाई करावी.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे

**प्रत:-** माहितीस्तव सादर -मा. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत:-** माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव, मुख्याध्यापक/ प्राचार्य, उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालये (सर्व),पुणे विभाग